<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. २९१/२०२२ निशाणी ४३ वरील आदेश</u>

(श्री. बजाबा बाबु दगडे वि. श्री. लक्ष्मण बजाबा दगडे )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेविरुध्द झालेला 'विना कैफियत' हा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांचा मेंढपाळ व्यवसाय असुन त्यांना मेंढया चारण्यासाठी सतत बाहेरगावी जावे लागत असल्याने व प्रतिवादी क्र. १ हे त्यांचे कुटूंबातील एकमेव कर्ते असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ५ प्रस्तुत दाव्यास कैफियत व जबाब दाखल करण्यास शक्य झाले नसल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे विरुध्द विना म्हणणेचा आदेश झालेला आहे. परंतु आज रोजी प्रतिवादी क्र. १ ते ५ हे कैफियत दाखल करण्यास तयार आहेत. प्रतिवादींनी कैफियत देण्यास जाणिवपूर्वक विलंब केलेला नाही. सदरचा हुकूम रद्द होणे आवश्यक असून वादी यांचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट, न्यायदानाच्या कामी मदत होणार आहे.

२. सदरच्या अर्जावर वादीतर्फे म्हणणे दाखल केले आहे व अर्जातील मजकूर अमान्य केला आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना दि. ०८.०९.२०२२ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दाखल केलेले नाही. दि. ०२.१२.२०२२ रोजी विना कैफियत आदेश झालेला आहे. कैफियत दाखल करण्यास एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचा विलंब झालेला आहे. त्यास प्रतिवादी तर्फे संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज

नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला.

४. रोजनामा पडताळून पाहिला असता प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दि. २१/०९/२०२२ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द दि. ०२/१२/२०२२ रोजी विना कैफियत आदेश झालेला आहे व प्रतिवादी क्र. ५ यांचे विरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. यावरुन प्रतिवादींनी कैफियत मुदतीमध्ये दिलेली नाही हे दिसून येते. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे कारण अर्जामध्ये नमूद केले आहे. त्याबाबत वादींनी नाकारलेले नाही. दाव्यातील वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता, दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी अर्ज मंजूर केल्याने मदतच होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादींचे नुकसान होणार नाही. परंतु, प्रतिवादीने केलेल्या विलंबाचा खर्च त्यांचेवर ठेवणे आवश्यक आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज (नि.क्र.४३) हा प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादी यांना रक्कम रुपये ३०० /– एवढा खर्च पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द 'विना कैफियतचा' आदेश व प्रतिवादी क्र. ५ चे विरुध्द एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2024.07.12 17:47:51 +0530

सासवड.
दिनांक – १०/०७/२०२४

**(श्रीमती एस. के. देशमुख)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सासवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mr. P. V. Satpute |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Jt. Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C. Saswad. |
| (c) | Date of Judgment /Order | : | 10/07/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P. O. on | : | 11/07/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 12/07/2024 |